October - 2020

(2)

# माहीती अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत माहीतीसाठी अर्ज

प्रति,
जन माहीती अधिकारी,
विधी विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका, भाईंदर.

मिरा-भाईंदर ... पालिका
आवक क्र. 02 मा.अ.
दिनांक: 09/10/2020




१ **अर्जदाराचे पूर्ण नांव :** गजेंद्र भालचंद्र रक्वी

२ **अर्जदाराचा पूर्ण पत्ता :** आनंद आश्रय, राम मंदिर रोड,
भाईंदर (पश्चिम) ४०१ १०१
मोबाईल नंबर ९८२०२०११११

३ **हव्या असलेल्या माहीतीचे वैशिष्ठ्य:**

अ **माहीतीचा विषय :** **मौजे भाईदर येथील आमच्या रक्वी कुटूंयाच्या जागांमध्यें बांधकाम परवानग्यांखालील बांधलेल्या इमारतीतील अनधिकृत बांधकामाबाबत**

आ **माहीतीचा कालावधी :** ०१.०१.२००६ पासून आजपर्यंत

इ **हव्या असलेल्या माहीतीचा तपशील:**

दिनांक२९.०६.२०११ रोजी नगररचना विभागाचे कनिष्ठ अभियंता, श्री. राजेंद्र पांगल व प्रभाग अधिकारी,प्रभाग क्र. १ श्री स्वप्निल सावंत यांनी केलेल्या पहाणी नंतरच्या त्यांच्या संयुक्त पहाणी अहवालानुसार रक्वी कुटूंबियांच्या भाईदर पश्चिम येथील खालील जागांमध्ये खालील अनधिकृत बांधकामे नोंदली गेली.

| | स. क्र. व हि.क्र. | इमारतीचे नांव | इमारतीचा पत्ता | अहवालानुसार अनधिकृत बांधकामाचा तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | ७०२ : २ | महागणपति टॉवर | बेकरी गल्ली | तळमजल्यावरील काही सदनिकात वाढीव बाधकाम व दुकानासाठी वापर |
| | ७०२ : २ | महागणपति टॉवर | बेकरी गल्ली | सातव्या मजल्यावरील मंजूर टेरेस बांधकाम बंदीस्त केलेले आहे. |
| २ | ६९६ : २ व ५ | सिध्देश्वर व शंखेश्वर | जे. पी. ठाकूर मार्ग | सिध्देश्वरच्या इमारतीच्या स्टील्टचा भाग बंदीस्त केला आहे. व शंखेश्वर |
| | ६९६ : २ व ५ | सिध्देश्वर व शंखेश्वर | जे. पी. ठाकूर मार्ग | शंखेश्वरच्या इमारतीचे स्टील्ट बंदीस्त करून सदनिका बांधलेल्या आहेत. |
| ३ | ६९५ : ३, ४, व ५ | न्यू सरोज को ऑप | जे. पी. ठाकूर मार्ग | इमारत प्रकार अे मध्यें तिसरया व चौथ्या मजल्यावर वाढीव बांधकाम |
| | ६९५ : ३, ४, व ५ | न्यू सरोज को ऑप | जे. पी. ठाकूर मार्ग | इमारत प्रकार बी मध्यें स्टील्टच्या जागेत दोन सदनिकाचे बांधकाम |
| ४ | ६९३ : २ | जय शंखेश्वर टॉवर | जे. पी. ठाकूर मार्ग | सदर इमारतीमध्यें ६ वा व ७ वा मजल्याचे वाढीव बांधकाम |
| ५ | ६८९ : ४अे | प्रथमेश आर्चिड | टेंबा रोड | प्रथमेश आर्चिड इमारतीमधील दुकानांचे मागील बाजूस वाढीव बांधकाम |
| | ६८९ : ४अे | साफल्य बंगला | टेंबा रोड | साफल्य बंगल्याचा भाग भोगवत दाखला घेतल्यानंतर स्टील्ट बंदीस्त केला |
| ६ | ६९१ : १ | सालासार सृष्टी ४ बंगले | टेंबा रोड | इमारत प्रकार सी च्या ४ पैकी ३ बंगल्यांच्या २ मजल्याव्या टेरेस काचेने बंद केला . |

**तरी मला खालील माहीती द्यावी, ही विनंती.**

१ वरील सर्व प्रकरणी अनथिकृत बांधकामाचे निष्कासन होऊ नये म्हणून संबधितांनी न्यायालयात दावे टाकले असल्यास त्या प्रत्येक दाव्याचा सदनिका, गाळा, सोसायटी वा विकासक निहाय तपशील द्यावा. ही माहीती आपल्या संकेत स्थळावर असेल तसे स्पष्ट कळवावे.

२ उपरोक्त बाबतीतल्या प्रत्येक दाव्यात काही महत्त्वाचे आदेश न्यायालयाने पारीत केले असतील तर त्याची माहीती द्यावी कारण ९ वर्षे लोटली तरी अनधिकृत बांथकामांवर कारवाई झालेली नाही.

कृपया मला आपल्या कार्यालयात येऊन संबद्धित नस्त्यांचे अवलोकन करून प्रति घ्यायला कळवू नये. माहीती मिळाल्यावर आवश्यक्ता वाटल्यास मी संबंधित नस्त्यांचे अवलोकन करीन व शुल्क भरून हव्या असलेल्या कागदपत्रांच्याच प्रति घेईन.

४ **माहीती कशा तऱ्हेने हवी:** **मला ९८२०२०११११ वर कळवावे. मी न्यायची व्यवस्था करीन.**

५ **अर्जदार दारीद्रय रेषेखाली आहे कां ?** नाही

ठिकाणः भाईदर दिनांकः ०९.१०.२०२०

**अर्जदाराची स्वाक्षरी**

RIGHT TO INFORMATION

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./०२/२०२०-२१
दि. ०९/११/२०२०

प्रति,

श्री. गजेंद्र रकवी
आनंदाश्रम, राम मंदिर रोड,
भाईंदर (प), ठाणे ४०११०१

**विषय :- केंद्र शासनाचा माहिती अधिकार २००५ अन्वये अर्ज.**
**संदर्भ :-** आपला दि. ०९/१०/२०२० रोजीचा अर्ज.

**महोदय,**

संदर्भिय माहिती अधिकाराच्या अर्जान्वये आपण नगररचना विभागाचे कनिष्ठ अभियंता श्री. राजेंद्र पांगळ व प्रभाग अधिकारी श्री. स्वप्निल सावंत यांनी पहाणी केल्यानंतर दि. २९/६/२०११ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार मौजे भाईंदर, सं. क्र. ७०२/२, ६९६/२,५, ६९५/३,४,५, ६९३/२, ६८९/४अे, ६९१/१ या जागेवरील इमारतींसंदर्भात मा. न्यायालयात मनपाविरुद्ध दाखल दाव्यांची माहिती अपेक्षिली आहे. त्याअनुशंगाने विधी विभागाकडील अभिलेख तपासले असता खालीलप्रमाणे दावा दाखल झाल्याची नोंद आढळून आलेली आहे.

१) दावा क्र. स्पे. सी. सुट. ८७/२००८ जिवन आशा बिल्डर्स विरुद्ध मिरा भाईंदर महानगरपालिका

२) दावा क्र. स्पे. सी. सुट. १४३/२०१२ जितेंद्र चौरसियया विरुद्ध मि.भा.मनपा

३) दावा क्र. आर. सी. एस. १२६४/२०१२ मे. एस आर. मेहता ॲण्ड सन्स विरुद्ध मि.भा.मनपा

तरी आपल्या अर्जाबाबत आपण विनंती केल्याप्रमाणे सदर दाव्यांचे अवलोकन करुन आपणास आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करून घेणेकरीता विधी विभाग येथे कार्यालयीन वेळेत येऊन सदर संचिकांचे अवलोकन करून विहित फी चा भरणा करून सदरची माहिती उपलब्ध करून घेण्यात यावी.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास आपणास श्री. अजित मुठे, मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त(मु), तिसरा मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रथम अपिल दाखल करता येईल.

9/11/2020

सई वडके
विधी अधिकारी तथा जनमाहिती अधिकारी
विधी विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका